जि.हिंगोली
दिनांक :- 06.12.2024

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक संजय दत्तात्रय गोरे, वय 47 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – पोलीस हवालदार ब.नं.05 (वर्ग-3) पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण मुळ रा.डिग्रस बु.ता.कळमनुरी जि.हिंगोली, ह.मु.गांधीनगर,मारोती मंदिराजवळ,बालाजी जाधव यांचे घरी,वसमत ता.वसमत जि.हिंगोली यांना 5,000/- रू.ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.23.10.2024 रोजी ला.प्र.वि.हिंगोली येथे लोकसेवक संजय दत्तात्रय गोरे, वय 47 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – पोलीस हवालदार ब.नं.05 (वर्ग-3) नेमणुक- पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण मुळ रा.डिग्रस बु.ता.कळमनुरी जि.हिंगोली, ह.मु.गांधीनगर,मारोती मंदिराजवळ,बालाजी जाधव यांचे घरी,वसमत ता.वसमत जि.हिंगोली यांनी तक्रारदार यांचे विरूध्द असलेल्या तक्रारी अर्जाचे चौकशीत तक्रारदार व त्यांचे पत्नीला पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे बोलावुन घेवुन सदर प्रकरण आपसात मिटवुन घेतले होते. त्यानंतर पोलीस हवालदार गोरे यांनी तक्रारदार यांना फोन करून तुमच्या विरूध्द परत आलेले अर्ज प्रकरण मिटवुन घेण्यासाठी 5,000/- रूपयाची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात तक्रार दिली होती.

त्यावरून दि.23.10.2024 रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडताळणीमध्ये यातील आलोसे यांनी तक्रारदार यांना सदर प्रकरण मिटवुन घेण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी 5,000/- रू.लाचेची मागणी करून सदर लाच स्विकारण्यास सहमती दिली. त्यावरून दि.05.12.2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक संजय दत्तात्रय गोरे, वय 47 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – पोलीस हवालदार ब.नं.05 (वर्ग-3) पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण यांनी पो.स्टे.वसमत ग्रामीण चे बीट अमंलदार रूममध्ये लाचेची रक्कम 5,000/-रू. अंदाजे 16.09 वाजताच्या सुमारास तक्रारदार यांच्याकडुन स्वत: स्विकारली. म्हणुन लोकसेवक संजय दत्तात्रय गोरे, वय 47 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद – पोलीस हवालदार ब.नं.05 (वर्ग-3) पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले असुन पो.स्टे.वसमत श.येथे गु.र.न.698/2024 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी श्री. संदिप पालवे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.हिंगोली, पोलीस निरीक्षक श्री.प्रफुल्ल अंकुशकर,पोलीस निरीक्षक श्री.विनायक जाधव, स.पो.उप.नि/युनुस शेख,विजय शुक्ला, पोहेकॉ/ज्ञानेश्वर पंचलींगे, तानाजी मुंढे, रविंद्र वरणे, राजाराम फुपाटे,भगवान मंडलीक, गोविंद शिंदे,गजानन पवार, चापोह/ शेख अकबर,मपोह/योगीता अवचार, पोशि/शिवाजी वाघ लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर परीश्रमीका व्यतिरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास कृपया लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुपचपत प्रतिबंधक कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**(विकास घनवट)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

टोल फ्री क्र.1064, दुरध्वनी क्र.02456-223055,
**मोबाईल क्रमांक :- 9822259932,8888578999,8788101993**